प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड , न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार ४ सप्टेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# शिवरायांचा खोटा इतिहास जनतेसमोर मांडू नका, शरद पवारांनी ठणकावून सांगितलं

## महामहोपाध्याय फडणवीसकृत इतिहास बदलायला निघालेत, संजय राऊतांचे टीकास्त्र

यापूर्वी शिवसेना उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीसांवर टीकास्त्र सोडलं होतं. 'शिवरायांचा नवा अपमान, महामहोपाध्याय फडणवीसकृत' या शीर्षकाखाली सामनाच्या अग्रलेखातून फडणवीसांवर राऊतांनी हल्लाबोल केला. 'मोगलांच्या आर्थिक नाड्या तोडण्यासाठी सुरत लुटायला हवी हे महाराजांचे धोरण होते व त्यानुसार सुरतवर स्वारी करून महाराजांनी दाणादाण उडवली, हे ऐतिहासिक सत्य असताना महामहोपाध्याय फडणवीस शिवरायांचा नवा इतिहास मांडून काय साध्य करीत आहेत? म.म. फडणवीस यांना शिवरायांचे शौर्य मान्य नसावे, हे पहिले किंवा सुरत महाराष्ट्राच्या राजाने लुटली ही जखम सध्याच्या गुजराती व्यापार मंडळास अस्वस्थ करीत असेल. त्यामुळे सुरत लुटीशी शिवरायांचा संबंध नसल्याची बतावणी म.म. देवेंद्र फडणवीस यांनी केली असावी,' असं अग्रलेखात म्हटलं होतं. ' छत्रपती शिवरायांनी सुरत लुटली नाही असा जावईशोध देवेंद्र फडणवीस यांनी लावला. शिवरायांचा मर्दानी इतिहास संपविण्यासाठी फडणवीस यांनी सुरू केलेल्या मोहिमेचाच हा एक भाग आहे. शिवराय व त्यांनी घडवलेल्या इतिहासाचा आणखी एक अपमान करण्याचा प्रमाद देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. छत्रपतींचा रोज एक अपमान करावा असे धोरण फडणवीस व त्यांच्या भाजपने स्वीकारले आहे काय?' असा खोचक सवालही सामनातून विचारण्यात आला होता.



शिवरायांनी सुरतेची लूट केली नसून त्यांनी सुरतेवर आक्रमण केल्याचं विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केलं होतं. तो मुद्दा उटलून धरत विरोधकांनी देवेंद्र फडणवीसांवर टीका केली होती. आधी जितेंद्र आव्हाड, नंतर संजय राऊत आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी देखील या मुद्यावरून फडणवीसांवर आणि सरकारवर निशाणा साधला आहे. ' वस्तुस्थिती वेगळी असताना, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी एक वेगळं विधान केलं. आणि त्यामध्ये त्यांनी असं ध्वनित केलं की अशी लूट करण्याचं काम शिवाजी महाराजांनी केलं नव्हतं. आणि चुकीच्या पद्धतीन इतिहास मांडण्याचं काम केलं जात आहे. ' असं शरद पवार म्हणाले. राज्यकर्त्यांकडून शिवरायांबाबत वेगळी विधानं केली जात आहेत. खोटा इतिहास हा जनतेसमोर, नव्या पिढीच्या समोर मांडू नये. चुकीचा इतिहास मांडायचा कोणी प्रयत्न केला तर समाजामध्ये गैरसमज निर्माण होतात, असे म्हणत शरद पवार यांनी फडणवीसांना टोला हाणला.

शिवाजी महाराजांनी एकदा नव्हे दोनदा सूरतेवर स्वारी केली होती, असं इतिहासकार सांगतात. , ती स्वारी करण्याचा उद्देश वेगळा होता. खोटा इतिहास हा जनतेच्या समोर मांडू नये, असं पवार म्हणाले.

शिल्पकाराला अनुभव कमी, एवढं मोठं काम देणं योग्य नव्हतं

राजकोट किल्ल्यावरील छ. शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. त्या पुतळ्याचं काम ज्यांना दिलं, त्या व्यक्तीचं (जयदीप आपटे) या क्षेत्रातील अनुभव अत्यंत मर्यादित होता. एवढं मोठं (पुतळ्याचं) काम त्याने कधी केलेलं नाही असं दिसतंय. असं असताना, त्याच्यावर ही जबाबदारी टाकणं , एवढं मोठं काम देणं हे योग्य नव्हतं, असं शरद पवार म्हणाले.

वाऱ्याच्या वेगामुळे किल्ल्यावरील शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला असं कारण मुख्यमंत्री आणि बाकीचे लोक सांगत आहेत. पण अनेक ठिकाणी महाराजांचे पुतळे आहेत.मुंबईत इंडिया गेटच्याजवळ, समुद्रकिनारी जो पुतळा आहे तो कित्येक वर्षांपासून उभा आहे, त्याला काही झालेलं नाही. त्यामुळे मालवणमध्ये जो पुतळा कोसळला,त्याबाबत जी कारण सांगितली जात आहेत, ती योग्य आहेत असं दिसंत नाही, अशा शब्दांत शरद पवार यांनी सरकारला फटकारलं.



# संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री.मनोज दादा आखरे यांचा वाढदिवस आष्टी येथील गोरगरीब मुलांना शालेय साहित्याची मदत करून साजरा

**आष्टी प्रतिनिधी:-**

*संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री. मनोजदादा आखरें यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथील आश्रम शाळेतील गोर गरीब मुलांना प्रा.शशिकांत कन्हेरे सर यांच्या शुभहस्ते शालेय साहित्याची मदत करून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक शिवश्री शशिकांत कन्हेरे सर होते.यावेळी मुख्याध्यापक राठोड सर यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी बोलताना कन्हेरे सर म्हणाले की,आपण या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देत समाजातील गरजू आणि गरीब मुलांना शालेय साहित्य देऊन दादांचा वाढदिवस साजरा केला.येथून पुढे आपल्या आश्रमासाठी जी काही अडचण किंवा मदत लागली तर कधीही मला किंवा संभाजी ब्रिगेड टीम ला हाक मारा आम्ही सर्व ताकदीनिशी आपल्यासोबत उभा राहू अशी ग्वाही दिली.या कार्यक्रमासाठी संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अविनाश जगताप,शिवसेना तालुका प्रमुख सुभाष राऊत,नवजीवन संगोपन केंद्र अध्यक्ष विकास म्हस्के मेजर,अमोल निकाळजे,दादा ढवळे,सुशांत कन्हेरे,निखिल राऊत,मुख्याध्यापक राठोड सर,शिक्षक वृंद व कर्मचारी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने पुन्हा एकदा दादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# बीड जिल्ह्याच्या विकासात हरित महामार्ग भर टाकणार!

## खा.बजरंग सोनवणेंच्या पत्राला नितीन गडकरींचा हिरवा कंदील

**बीड/प्रतिनिधी**

दळणवळण सोयीस्कर होण्यासाठी सुरत-चेन्नई हरित महामार्ग प्रकल्प भारत सरकार अंतर्गत बांधला जात आहे. हा प्रस्तावित महामार्ग महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, बीड, धाराशिव आणि सोलापूर अशा पाच जिल्ह्यांमधून जातो आहे.त्यामुळे बीड जिल्ह्यातून गेलेल्या महामार्गांना सुरत-चेन्नई हरित महामार्ग जोडला गेल्यास त्याचा फायदा होईल. त्याचबरोबर मराठवाड्याचा दुष्काळी भाग परराज्यांना जोडला जाईल. त्यामुळे दळणवळण करण्यास चालना मिळेल. आशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना दिले होते. त्या पत्राला त्यांनी हिरवा कंदील दाखविला आहे.

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी, भारत सरकार प्रस्तावित सुरत-चेन्नई रहित महामार्ग संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र दिले होते. त्यामध्ये त्यांनी मागणी केली होती की, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातून सुरत-चेन्नई हरित महामार्ग जात आहे,मात्र बीड



जिल्हा मुख्यालय ठिकाणापासून लांब अंतरावर आहे.या प्रकल्पामध्ये अरणगाव तालुका जामखेड येथे वाहने चढण्यास व उतरण्यास सुविधा देण्यात आली आहे. या ठिकाणापासून जामखेड-खर्डा-चौसाळा- माळेगाव येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 548 ला सुपर दिला गेला तर मराठवाड्याच्या दळणवळणाला अधिक चालना मिळेल.अविकसित मानल्या जाणाऱ्या भागाला विकासाची जोड निर्माण होईल. तसेच चौसाळा येथे बीड जिल्हा मुख्यालय ठिकाणाला जोडला जाईल.त्यामुळे केज, माजलगाव, धारूर येथील रस्त्यांचे जाळे तयार होईल.अशी मागणी केली होती.

सुरत-चेन्नई महामार्ग हा साळेगाव येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 548 पासून नांदूरघाट पुढे चौसाळा येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 52 येडशी छत्रपती संभाजी नगरला जोडून पुढे खरडा ते दिघोळ फाटा पैठण पंढरपूर पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 752 इतरला जोडून जामखेड अरणगाव येथून अंदाजीत लांबी 86 किमी होईल. यामधील काही किलोमीटर लांबीचे रस्ते हे राष्ट्रीय महामार्ग दर्जाचे आहेत व काही लांबीचे रस्ते हे राज्य महामार्ग असून त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन ते त्याचे रुंदीकरण हे दोन लेन पेव्हड शोल्डरमध्ये करावे. कारण बीड शहर व बीड जिल्ह्यातील केज, धारूर, माजलगाव तालुक्यासाठी सुपर कनेक्टिव्हिटीचे काम करेल. अशी कनेक्टिव्हिटी तयार झाल्याने मराठ्यातील मागास मानल्या जाणाऱ्या भागाला विकसित होण्यासाठी मदत होईल आणि हा भाग राज्याशी जोडला जाईल.अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली होती.त्या मागणीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे बीडच्या विकासात आणखीन भर पडली जाणार आहे.

# दिव्यांग बांधवांना 5% टक्के निधी लवकर वाटप करावा. संकेत लंगडे

## प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्याची पंचायत समिति कार्यालयाकडे निवेदनाद्वारे मागणी



वडवणी प्रतिनिधी पंचायत समिती वडवणी अंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायत ग्रामसेवकांनी तात्काळ दिव्यांग 5% निधी वाटप करावा यासाठी गटविकास अधिकारी कार्यालयास प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी माजलगाव प्रहार तालुका अध्यक्ष गोपाळ पैंजणे, वडवणी प्रहारचे प्रशासकीय मार्गदर्शक उत्तम विधीज्ञ सुनील डोंबाळे साहेब, वडवणी तालुकाध्यक्ष संकेत लंगडे व दत्ता भारती, विशाल लंगडे,उपस्थीत होते.

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ शिवनंदा मेहेत्रे यांचा मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने सत्कार !

**जालना (वार्ताहर )** येथील जिल्हा परिषद प्रशाला मुलांची मल्टीपर्पज हायस्कूल जालना या ठिकाणी मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असलेल्या इंग्रजी विषयाच्या शिक्षिका डॉ शिवनंदा मेहेत्रे यांना सन २०२३-२४ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने त्यांच्या राहत्या घरी त्यांचे पती श्री हरकळ साहेब सेवानिवृत्ती आरोग्य कर्मचारी यांच्यासमवेत शाल, पुष्पगुच्छ व प्रसिद्ध ग्रामीण कवी श्रीकांत गायकवाड यांचा रानफुले हा काव्यसंग्रह देऊन सहदय सत्कार करण्यात आला. शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातून राज्यातील 110 शिक्षकांपैकी जालना जिल्ह्यातील दोन शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे .त्यापैकी डॉ शिवनंदा मेहेत्रे या एक शिक्षिका होत. त्यांनी शंभर शिक्षक क्लब ,अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला यांच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक , साहित्यीक व सामाजिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केलेली आहे. त्या उत्तम प्रकारच्या



लेखिका सुद्धा आहेत.याच बाबींची विशेष उल्लेखनीय कामगिरी पाहूनच शासनाने त्यांना आदर्श माध्यमिक शिक्षिका म्हणून पुरस्कार जाहीर केलेला आहे. येत्या ५ सप्टेंबर म्हणजे शिक्षक दिनी शासनाच्या वतीने मुंबई या ठिकाणी त्यांचा विशेष गौरव केला जाणार आहे. त्यांचा सत्कार करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटटे, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा सचिव संजय येळवते,मार्गदर्शक तथा बामुक्टो संघटनेचे सरचिटणीस तथा जून्या पेन्शन संघटना राज्याध्यक्ष , प्रसिद्धअर्थतज्ञ डॉ मारुती तेगमपुरे,केंद्रीय कार्यकारणी सदस्य आरेफ कुरेशी,कोषाध्यक्ष नारायण मुंडे, कार्याध्यक्ष एफ ए सय्यद,उपाध्यक्ष जगन वाघमोडे, सहसचिव प्रद्युम्न काकड,महिला आघाडीच्या शहराध्यक्ष ज्योती पांगारकर, श्रीमती मगर प्रबोधनकार ठाकरे महाविद्यालय शहागड व इतर कार्यकर्ते उपस्थित होते

# काँग्रेसच्या पर्यावरण विभागाच्या रायगड जिल्हा सरचिटणीस पदी जितेश म्हात्रे तर उरण शहर अध्यक्ष पदी गुफरान तुंगेकर

उरण । प्रतिनिधीदे काँग्रेस पक्षाचा तळागाळात प्रचार व प्रसार करण्याच्या हेतूने व गोर गरिबांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने मंगळवार दि ३ सप्टेंबर २०२४ रोजी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी काँग्रेसच्या विविध कार्यकर्त्यांवर महत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. यावेळी विविध कार्यकर्त्यांची विविध महत्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी पर्यावरण विभाग अंतर्गत उरण शहर काँग्रेस कमिटी पर्यावरण विभागाच्या अध्यक्ष पदी काँग्रेसचे कट्टर एकनिष्ठ व प्रामाणिक कार्यकर्ते गुफरान सईद तुंगेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी पर्यावरण विभाग अंतर्गत रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी पर्यावरण विभागाच्या सरचिटणीस पदी काँग्रेसचे कट्टर एकनिष्ठ व प्रामाणिक कार्यकर्ते जितेश दत्ताराम म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जेष्ठ नेते नंदराज मुंगाजी, पर्यावरण विभागाचे रायगड जिल्हाध्यक्ष राजीव पाटील, पर्यावरण विभाग उरण तालुका अध्यक्ष अंगत ठाकूर आदी पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते. गुफरान तुंगेकर व जितेश म्हात्रे यांना जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. श्री. मल्लिकार्जुन खर्गे साहेब, माजी अध्यक्षा सन्माननीय श्रीमती. सोनिया गांधी, सन्माननीय श्री. राहुलजी गांधी तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. नानाभाऊ पटोले व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे अध्यक्ष समिरजी वर्तक व रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रजी घरत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या बळकटीसोबतच पर्यावरण विभागातर्फे संवर्धनाचे प्रभावीपणे काम करू. पक्षाचे ध्येय धोरणे तळागाळात पोहोचवू. पक्षाच्या माध्यमातून गोर गरिबांना न्याय देऊ असा निश्चय यावेळी नवनियुक्त पदाधिकारी गुफरान तुंगेकर व जितेश म्हात्रे यांनी केला आहे या नियुक्ती बद्दल गुफरान तुंगेकर, जितेश म्हात्रे यांनी सर्व वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. गुफरान तुंगेकर यांची पर्यावरण विभागाच्या उरण शहर अध्यक्ष पदी तर जितेश म्हात्रे यांची पर्यावरण विभागाच्या रायगड जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



## शासनाचे नियम पायदळी तुडवत हरगडवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाचा अजब कारभार !

### शाळेचे नियमबाह्य स्थलांतर आमरण उपोषणाचा ग्रामस्थांचा आजचा तिसरा दिवस प्रशासनाचे दुर्लक्ष



केज । प्रतिनिधी तालुक्यातील विडा केंद्रांतर्गत येत असलेल्या हरगडवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या नियमबाह्य स्थलांतर प्रकरणी ग्रामस्थांनी शाळेच्या मुख्याध्यापकाच्या विरोधात बीड येथील जि. प. कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. मात्र प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. येथील जिल्हा परिषद शाळा मूळ ठिकाणी न भरता तिचे स्वतःच स्थलांतर करून ती वडमाऊली देवस्थान ट्रस्ट च्या जागेत भरवली जात आहे. मूळ ठिकाणापासून एक किमी अंतरावर या शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा भरविण्याचा अजब प्रकार केला आहे. याच्याविरोधात येथील भास्कर मोरे यांच्यासह इतर लोकांनी सोमवार (दि. २ )पासून जि.प. कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. तसेच वडदरा येथील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड घेऊन त्यामध्ये स्वतःच बदल करून बोगस नोंद केल्याचे उघडकीस आले आहे. या शाळेचे मूळ ठिकाणी स्थलांतर करून दोषी शिक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## बचत गटाच्या गरिब महिलेचे 46, 800 रुपये झाले गहाळ ; केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

केज । प्रतिनिधी शेतातील मजुरी करुण आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या तसेच बचत गटाच्या माध्यमातून काम करणाऱ्या महिलेचे पैसे भरण्यासाठी घेऊन जात असता तब्बल ४६,८०० रुपये गहाळ झाले आहेत. केज तालुक्यातील मौजे कोटी येथील सौ. कोमल कृष्णा शिनगारे वय ३० वर्ष या शेतातील मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात त्यावरच त्यांच्या कुटुबांची उपजीवीका आहे .तसेच त्यांनी मौजे कोटी येथील सर्व मागासवर्गीय महिलांना एकत्र करून रमाई महिला बचत गट स्थापन केला तो गट नवचेतना सर्वांगिन विकास संस्था केज यांच्याशी जोडला गेला. त्या माध्यमातून महिलांना कर्ज देणे व परतफेड करणे आदि कामे त्या गटाच्या माध्यमातून करत होत्या. दि.२६ ऑगस्ट २०२४ रोजी त्या मौजे कोटी येथुन बचत गटातील महिलांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड तथा पैसे जमा करण्यासाठी केज येथील आयडीबीआय बँकेत जात असता दुपारी ३.३० वाजता माऊली मेडीकल केज ते येवले चहावाले केज-बीड रोडवर त्याच्या पर्समधुन रोख रक्कम ४६,८०० रुपये गहाळ झाले आहेत. त्यांच्या सदरील गोष्ट लक्षात आली असता त्यांनी रोडवर शोधाशोध केली परंतु रक्कम सापडत नसल्याने त्यांनी केज पोलिस गण्यात एक लेखी अर्ज दिला असता सौ. कोमल कृष्णा शिनगारे याच्या फिर्यादीवरून केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे . पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोह. चौधरी हे करत आहेत.

सदरील बचत गटाचे ४६ ,८०० रुपये गहाळ झालेमुळे सौ. कोमल कृष्णा शिनगारे यांना मोठा धक्का बसलेमुळे त्यांची तब्बेत खालावली असून तसेच परिस्थिती बेताची असुन आता पैसे कसे भरायचे ? हा प्रश्न त्याच्यासमोर पडला आहे .

## जनते साठी चौवीस तास उपलब्ध असणारे लोकप्रतिनिधी कोणत्या बिळात बसले जनतेचे हाल दिसत नाहीत का?

# तलावातुन रस्ता काढत नागरीकांचा जिवघेणा प्रवास

## आम्ही पण माणसच आहोत जनावर नाहीत आम्ही रस्ता मागतोत तुमच्या खिशातले पैसे नाही

# लोकप्रतिनिधी हो माणूस संकट काळीच तुम्हाला मेसेज करतात रिप्लाय तरी देत जा

केज । सचिन भालेराव केज तालुक्यातील सोनिजवळा येथील भवानी वस्ती ते ढाकेफळ रस्त्यावर दोन तलाव आहेत या तलावातुन रस्ता असल्याने येथील नागरिकांना प्रत्येक वर्षी याच पाण्यातुन रस्ता शोधत जाव लागत आहे या बाबत सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील सोनिजवळा येथील भवानी वस्ती ते ढाकेफळ रस्त्याची दुरवस्था झालेली आहे या रस्त्यावर आनेक घरे आहेत, या रस्त्यावरून शाळकरी मुलांना ये जा करावा लागत आहे, सर्व जाती धर्माचे लोक या रस्त्याच्या आप आपल्या शेतात घरे बांधून रहात आहेत, या आनेक वेळा तोंडी लोकप्रतिनिधींना सांगितले परंतु आज पर्यंत कोणीही या कडे डोकावून पाहिले नाही, मंग आम्ही माणसं नाहीत का? आसा प्रश्न निर्माण झाला आहे, शाळेत जाणारे लहान मुल आसतील किंवा वयोवृद्ध व्यक्तींना जर रात्री बेरात्री काही अडचण आल्यास या रस्त्यावरून कसा प्रवास करायचाय , पर्यायी रस्ता नाही, हा सर्व माहिती आमदार पती, आमदार सासरे, सरपंच, ग्रामसेवक, खासदार, यांना वॉटसप द्वारे माहीती दिली परंतु कांहींनी बघुन Ok तर काहींनी तर बघीतलेच नाही, जनते साठी चौवीस तास उपलब्ध असणारे कुठे बसले,का फक्त निवडणुकीत आश्वासनांची खैरात वाटायची आणि जनतेला वेड्यात काढायचं आणि मोकळं व्हायचं, आसले धंदे बंद करा जनतेचे काम होत असतिल तर करा नाहीतर खोटे आश्वासन देऊन जनतेची दिशाभूल करु नका, निवडणुकीत खोटी आश्वासने देताना जरा सुध्दा वाटली पाहिजे कि आपण याच माय बाप जनतेच्या जिवावर निवडुन येतात आणि पुन्हा यांच्या कडे डुंकुनही पहात नाहीत जनाची नाही पण मनाची तरी थोडी या लोकप्रतिनिधी ठेवून जनतेचे काम करावे, निवडणुकीत हेच आमची माय बाप जनता म्हणायचे परंतु हिच जनता मेली का जिवंत आहे हे पाच वर्षे बघायचे नाही हेच का तुमचे बघायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे , आम्ही सुद्धा माणसंच आहोत आमचा रस्ता दुरुस्त करता आला नाही तर पर्यायी रस्ता तरी आम्हाला करुन द्या आशी येथील नागरीक म्हणत आहेत १) भवानी वस्ती ते ढाकेफळ रस्त्यावर दोन तलाव आहेत या तलावातुन रस्ता असल्याने दुसरा पर्यायी रस्ता नाही,आमचे लहान मुल याच रस्त्यावरून शाळेला ये जा करावा लागत आहे, वयोवृद्ध व्यक्तींना दवाखाना व दळणवळणासाठी याच रस्त्यावरून जाव लागत आहे, खासदार, आमदार, सरपंच,ग्रामसेवक, यांना फोटो टाकुन माहिती दिली परंतु एकाही लोकप्रतिनिधींनी उत्तर दिले नाही, तहसिलदार,यांना फोन करून माहीती दिली तर थोड्यावेळाने सांगातो साहेबांचे आजुन थोडावेळ झाला नाही , साहेब, नेते हो माणुस मेल्यावर त्यांना सांत्वन पर भेट देऊन फोटो शेअर करण्यापेक्षा जिवंत माणसाला मदत करा भवानी वस्ती ते ढाकेफळ रस्त्यावरील रहीवाशी, सोनिजवळा




२)भवानी वस्ती ते ढाकेफळ रस्त्याची अत्यंत दुरअवस्था झालेली आहे येथील नागरिकांना दळणवळण व शाळेतील मुलांना अडचणीला सामोरे जावे लागत आहे या रस्त्याची वेळीच दखल लोकप्रतिनिधी घेतली नाही तर वार्ड क्रं दोनचे उमेदवार या नात्याने तिवृ आंदोलन मिनाज पठाण ग्रामपंचायत सदस्य वार्ड २

## सरस्वती नदीच्या पुराचे पाणी शिरले नागरी वस्तीत.

### अनेक कुटुंबाचे संसार पाण्यात परळी नगरपालिकेचा ढिसाळ कारभार उघड

परळी । प्रतिनिधी परळी शहरात दोन दिवसापासून सतदार पाऊस सुरू असल्याने शहरातून वाहत जाणारी सरस्वती नदीला पूर आला आहे, यामुळे शहरातील नदीकाठच्या अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे. त्यामध्ये रहमत नगर,इंदिरानगर, कीर्ती नगर,गंगासागर नगर, भोई गल्ली, खुदबे नगर, पेठ मोहल्ला या नदीकाठच्या सकल भागात घरात पाच फुटापर्यंत पाणी शिरले आहे. नगरपालिकेच्या ढिसाळ कामाची ही सर्वात मोठी पावती परळीकरांना मिळाली आहे. या भागातील नागरिकांनी प्रशासनाला संपर्क केला असता कोणी फोन उचलले नाहीत व मदत पाठवली नाही.



नदीपात्राचे पाणी वस्त्यांमध्ये शिरल्यामुळे नागरिक आपला जीव मुठीत घेऊन इतरांच्या बिल्डिंग वर आसरा घेत आहे. यामुळे शहरातील सरस्वती नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरले असून अनेक जणांचे संसार हे पाण्यात बुडाले आहेत. नगरपालिका प्रशासनाने या गोष्टीची खबरदारी म्हणून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देणे आवश्यक होते. परंतु तशा सूचना दिल्या गेल्या नाहीत. इंदिरानगर, कृष्णा नगर, कीर्ती नगर,गंगासागर नगर ,शनी मंदिर ,अम्बवेस, भोई गल्ली, गोपाळकृष्ण टॉकीज च्या पाठीमागे भाग,शनी मंदिर या पुराच्या पाण्याने जास्त प्रभावित झाले आहे.नाले सफाई ची मोहीम हाती घेण्यात आली होती का?अशी चर्चा आता जोर धरत आहे. आपातकालीन सेवा फक्त नवापूर दिसून येतआहे.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या तालुक़ा स्तरीय मेळावा संपन्न

केज । शेख सज्जाद

साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहूजन कल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहीती तळागाळातील लाभार्थीपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी इतरमागास बहुजन कल्याण विभाग बीड येथील निरीक्षक श्री. लक्ष्मण बारगजे यांनी विविध योजनांची माहीती देऊन लाभ घेण्याचे आवाहन केले या वेळी ते म्हणाले की,इतर मागास बहुजन कल्याण विभाग राज्यातील प्रत्येक तालुक्यात तालुकास्तरीय मेळावे घेऊन या विभागा मार्फत राबविण्यात येणा-या विविध योजना ह्या समाजातील तळागाळापर्यंत लोकापर्यंत पोहचली पाहिजे या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करत आहे. या विमागा मार्फत 1953 सालापासून निवासी आश्रम शाळा चालविण्यात येतात या विभागामार्फत चालणा-या ऊसतोड प्रवर्गातील साने गुरुजी निवासी विद्यालय हे राज्यातील आय.एस.ओ. मानांकन मिळविणारी प्रथम निवासी शाळा आहे असे गौरवोदगार ही त्यांनी या प्रसंगी काढले. राज्यातील नामांकित इंग्रजी शाळात धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना मोफत व निवासी वसतीगृह चालवितात.अशा अनेक योजनांची त्यांनी शासन राबवित असलेल्या योजनांची माहीती देतांना सांगीतले की महाज्योतीच्या माध्यमातुन विद्यार्थांच्या शिक्षणसाठी प्रशिक्षण व अर्थसहाय्य योजना,इतरमागासवर्गीय महामंडळामार्फत विविध कर्ज योजना तसेच श्यामराव पेजे



कोकण इतरमागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ,संत काशिबा गुरव यूवा आर्थिक विकास महामंडळ,जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ,संता सेनाजी महाराज केश शिल्पी आर्थिक विकास महामंडळ यासह ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलीसाठी वस्तीगृह,वि.जा.भ.ज.साठी आश्रमशाळा,धनगर समाजासाठी आवास व तांडावस्ती सुधार योजना आदी योजनांची साविस्तर माहीती दिली. प्रमुख अतिथी श्री. शिवाजी चाटे संस्थापक अध्यक्ष यांनीही आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे अध्यक्ष एड.श्री. उद्धवराव कराड यांनी सांगितले की,शासन विविध योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्रचार आणि प्रसार करत आहे याचा सर्वांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे अवाहन त्यांनी केले. व्यासपीठावर श्री अजित चाटे, संचालक गजानन शिक्षण विद्या प्रसारक मंडळ तांबवा, नगर सेवक बाळासाहेब गाढवे श्री रामधन अशोक चाटे उपसरपंच तांबवा , गणेश कांदे सामाजिक कार्यकर्ते, श्री प्रसाद शुक्ला सर, गोविंद देशपांडे सर, श्री शेख एन एस श्री सोन्नारर आर पी, श्री हातागळे सर, वैशाली सांगळे, उपस्थित होते.श्रीमती शेख मॅडम व त्यांच्या संस्कृतीक विभागाचा चमु यांनी शब्दसुमनांनी उपस्थित यांचे स्वागत केले. सुत्रसंचलन प्रा डॉ.कविता गित्ते/कराड यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री बारगजे व्ही.पी यांनी केले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गीत वंदे मातरम यांनी झाली. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक शिक्षक विद्यार्थी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्य प्रशासकीय सेवेतील उपजिल्हाधिकारी संवर्ग सेवाज्येष्ठता वाद सर्वोच्च न्यायालयात निकाली

## उपजिल्हाधिकारी यांच्या पदोन्नत्या होऊन महसूल विभागातील प्रशासकीय शिथीलता दूर होणार

बीड दि.3 :- राज्य प्रशासकीय सेवेतील उपजिल्हाधिकारी संवर्ग सेवाज्येष्ठता वाद सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निकाली काढीत काही पदोन्नत उपजिल्हाधिकाऱ्यांच्या गटाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका सुनावनी घेत फेटाळून लावली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा 8 ऑगस्टचा निकाल कायम ठेवत उपजिल्हाधिकारी सेवा जेष्ठता यादीचा वाद अंतिमरित्या संपुष्टात आला आहे. या निकालाचा परीणाम म्हणून आता त्यामुळे उपजिल्हाधिकारी यांच्या पदोन्नत्या होऊन महसूल विभागातील प्रशासकीय शिथीलता दूर होणार आहे. उपजिल्हाधिकारी संवर्गामध्ये उपजिल्हाधिकारी पदावर येण्याचे दोन मार्ग आहेत. एक प्रत्यक्ष एमपीएससी द्वारे परीक्षा देऊन सरळसेवा म्हणून येतात व दुसरे हे तहसीलदार या पदावरून पदोन्नती घेऊन येतात. उपजिल्हाधिकारी संवर्गात 65 टक्के पदोन्नत तहसीलदार हे उपजिल्हाधिकारी असले पाहिजे तर 35 टक्के हे प्रत्यक्ष सरळसेवा उपजिल्हाधिकारी असले पाहिजे असे प्रमाण ठरलेले आहे. परंतु गेल्या काही वर्षात नियमाप्रमाणे ठरलेले हे प्रमाण न पाळता जास्तीचे तहसीलदार संवर्गातून उपजिल्हाधिकारी पदोन्नत केले गेले आणि त्यामुळे सरळसेवा उपजिल्हाधिकारी यांच्यावर व त्यांच्या पदोन्नतीवर यामुळे गंभीर परिणाम झाला. यामुळे उपजिल्हाधिकारी यांची पदोन्नती होऊन अप्पर जिल्हाधिकारी होण्याचा कालावधी हा 20 ते 22 वर्षे एवढा वाढला होता. यावर मार्ग काढून शासनाने सेवाजेष्ठता यादी बनवताना या जास्तीच्या पदोन्नत केलेल्या तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील ज्येष्ठता क्रमांक दिला आहे. या मागची एकूण पार्श्वभुमी शासनाने नियमानुसार केलेल्या या कारवाईने व्यथित होऊन काही पदोन्नत उपजिल्हाधिकारी हे सुरुवातीला मॅट औरंगाबाद येथील न्यायालयात गेले. तेथे त्यांच्या विरोधात निकाल लागल्यानंतर ते पुन्हा उच्च न्यायालय- औरंगाबाद खंडपीठात गेले. तेथेही प्रकरण विरोधात गेल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. ती याचिका दिनांक 2 सप्टेंबर 2024 रोजी फेटाळली गेली. यामुळे उपजिल्हाधिकारी संवर्गाचा सेवा जेष्ठता वाद हा अंतिमरित्या संपुष्टात आला.

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उपजिल्हाधिकारी सेवाज्येष्ठता यादी वाद संपुष्टात येईल.आता कमी वर्षात पदोन्नती होईल अशी अपेक्षा आहे.

श्री. अविनाश पाठक, जिल्हाधिकारी बीड .

आता उपजिल्हाधिकारी संवर्गाची प्रशासकीय कुंठितता दूर करून त्यांना अपर जिल्हाधिकारी ही पदोन्नती द्यावी अशी मागणी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे उपजिल्हाधिकारी यांनी केली असून याबाबत तेही सकारात्मकता दर्शवीली आहे.

# कुसळंबकरांच्या धार्मिकतेत भर ; हनुमंत पवार अध्यक्षपदी विराजमान!

## जिल्हाध्यक्ष प्रशांत कदम, चैतन्य महाराज, रामकृष्ण महाराज, पांडुरंग महाराज यांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ सोहळा संपन्न

## वारक-यांच्या हिताचे कामासाठी प्रधान्य देऊ - हनुमंत पवार



कुसळंब | प्रतिनिधी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने राष्ट्रवादी आध्यात्मिक आणि वारकरी आघाडीच्या नियुक्त्या नुकत्याच पुणे येथे संपन्न झालेल्या चला वारकरी या कार्यक्रमांमध्ये देण्यात आल्या होत्या. पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील हनुमंत नामदेव पवार यांना आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेच्या अध्यक्षपदी नियुक्त करून कुसळंबकरांच्या अभिमानात भर टाकली आहे, त्याबद्दल कुसळंबवासीयांकडून राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे खूप खूप आभार व्यक्त केले असून रविवारी जिल्हाध्यक्ष प्रशांतजी कदम यांच्या उपस्थितीमध्ये त्यांना कुसळंब मध्ये नियुक्तीपत्र देण्यात आले. राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडीच्या आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच्या अध्यक्षपदी हनुमंत अण्णा पवार यांची नियुक्ती झाल्याने कुसळंब गावच्या अभिमानात भर पडली असून येणाऱ्या काळात धार्मिक वारकरी संप्रदायामध्ये जे काम करता येईल त्यासाठी अधिक जोमाने काम करू असे देखील या कार्यक्रमाप्रसंगी अण्णा यांनी सांगितले तर मान्यवरांनी अण्णांना शुभेच्छा देऊन आपल्या पदाचा उपयोग धर्मासाठी धर्माच्या हितासाठी वारकऱ्यांसाठी करावा असे या ठिकाणी मनोगत व्यक्त केले. तसेच जिल्हाध्यक्ष प्रशांत कदम यांनी पक्षाच्या माध्यमातून धार्मिक सांप्रदायिक वारकऱ्यांसाठी जे शक्य होईल ते पक्षाच्या माध्यमातून करू असाही या ठिकाणी शब्द दिला. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक भजनी मंडळी युवक वर्ग सर्वसामान्य नागरिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते...

### वारकरी भजनी मंडळीसाठी विशेष कार्य करू - प्रशांतजी कदम

राष्ट्रवादी अध्यात्मिक व वारकरी आघाडी ही वारकऱ्यांसाठी आणि भजनी मंडळी भक्तांसाठी काम करणारी आघाडी आहे. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे अध्यक्षपदी कुसळंबचे भूमिपुत्र हनुमंत नामदेव पवार यांची नियुक्ती करून या परिसराला विधानसभेला बळ देण्याचे काम केले असून येणाऱ्या काळात धार्मिक क्षेत्रातील सर्व कामे मार्गी लावण्यासाठी तसेच वारकऱ्यांना न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू..

- प्रशांतजी कदम
जिल्हाध्यक्ष : राष्ट्रवादी अध्यात्मिक व वारकरी आघाडी बीड.

### ज्ञानोबा-तुकोबाचा विचार युवा पिढीत प्रसार करण्यासाठी आघाडी

सध्या कीर्तनकार कोणत्यातरी एखाद्या पक्षाची बाजू घेऊन त्यांच्या नेत्याचा प्रसार कीर्तनाच्या माध्यमातून केला जातोय परंतु खऱ्या अर्थानं ज्ञानोबा तुकोबांचा विचार प्रसारित करणे गरजेचे आहे आणि तो होताना कुठेच दिसत नसल्याने राष्ट्रवादी अध्यात्मिक आणि वारकरी आघाडीची स्थापना केली असून खऱ्या अर्थाने ज्ञानोबा तुकोबांचा विचार प्रसार करण्यासाठी आघाडी काम करेल आणि युवा पिढीला त्यांच्या विचारातून प्रेरित करेल यासाठीच ही आघाडी स्थापन केली आहे असेही पक्षांच्या नेत्याकडून सांगण्यात आले आहे.

# मुसळधार पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान



अंबाजोगाई । परवेज पटेल अंबाजोगाई शहरासह परिसरात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस असून त्यामुळे परिसरातील शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साचुन पिकांचे नुकसान झाले आहे त्यामुळे पंचनामे करून मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे. शासनाने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत सततच्या मुसळधार पावसामुळे शहरातील आणि परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक गावांचा संपर्क तुटल्यामुळे महसूल प्रशासनाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे दोन दिवसापूर्वी रात्रीपासून पावसाला सुरुवात झाली पावसाने जोर धरल्यामुळे अनेक गावातील शेतामध्ये सर्वत्र सततच्या मुसळधार पावसामुळे शहरातील आणि परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक गावांचा संपर्क तुटल्यामुळे महसूल प्रशासनाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे दोन दिवसापूर्वी रात्रीपासून पावसाला सुरुवात झाली पावसाने जोर धरल्यामुळे अनेक गावातील शेतामध्ये सर्वत्र पाणी साचले होते रात्रभर मुसळधार असलेला पाऊस सकाळीही जोरातच होता दिवसभर पावसाची हजेरी होती पावसाने उघडीप न दिल्याने सूर्यदर्शन झाले नाही त्यामुळे दुपारपर्यंत जयवंती, वाणा या सह इतर तलाव ओढे तुडूंब भरले होते अंबाजोगाई, केज सह इतर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग मांजरा धरणात होत आहे. तालुक्यातील ग्रामीण भागातील वाहतूक बंद होण्याच्या मार्गावर आहे शहराच्या अनेक भागातील रस्त्यावर, वस्ती भागात पाणी झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले तालुक्यात अनेक छोट्यामोठ्या नद्यांना पूर आला असून शहरासह परिसरातअनेक ठिकाणी वाहने थांबलेली दिसून आली दिवसभर धो धो पाऊस सुरू असल्यामुळे झाल्याने सोयाबीन, मुग, उडीद या पिकांना मोठा फटका बसला असून सखल भागांमध्ये पाणी साचल्याने बऱ्याच शेतातील सोयाबीन पिके बुडून गेल्याचे दिसून आले तर अति मुसळधार पावसाचा इशारा दिल्यामुळे पुढील काही दिवस पाऊस पडणार असल्याचे हवामान विभागाच्या वतीने सूचना केली जात आहे मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसाने अंबाजोगाई व परिसरात पिकांचे नुकसान झाल्याने विमा कंपनी, महसूल आणि कृषी खात्याने तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले आहेत शेतकऱ्याला या मुळे दिलासा मिळाला आहे

# राजाराम मोरे यांची रायगड जिल्हा परिषद प्रशासनाकडून 'सहाय्यक गट विकासअधिकारी' माणगाव पदी बढती

बोरघर । प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद अलिबाग विभागांतर्गत माणगाव पंचायत समितीच्या 'सहाय्यक प्रशासन अधिकारी' या पदावर कार्यरत असणारे राजाराम अनंत मोरे यांच्या आजवरच्या प्रशासकीय कार्याची रायगड जिल्हा परिषद प्रशासनाने दखल घेऊन त्यांची माणगाव पंचायत समिती कार्यालय येथे 'सहाय्यक गट विकास अधिकारी' पदावर नियुक्ती करून बढती करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचे रायगड जिल्हा परिषद व माणगाव पंचायत समिती कार्यालय,कौटुंबिक आप्त परिवार, मित्र परिवार आणि सामाजिक स्तरातून सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



राजाराम मोरे हे ८ जानेवारी १९९० रोजी माणगाव पंचायत समिती येथे रुजू झाले होते, आणि आता त्याच ठिकाणी त्यांना 'सहाय्यक गट विकास अधिकारी' या पदावर बढती देण्यात आली आहे. राजाराम मोरे यांना प्रथम पदोन्नती हि १० ऑक्टोबर २००३ मध्ये बालविकास प्रकल्प विभागात मिळाली होती तर दुसरी पदोन्नती हि १ फेब्रुवारी २०१३ मध्ये म्हसळा पंचायत समिती येथे 'कनिष्ठ प्रशासन अधिकारी' या पदावर देण्यात आली होती. तसेच राजाराम मोरे यांनी सुधागड पाली पंचायत समिती येथे देखील रोखपाल पदावर काम केले आहे. एकंदरीत राजाराम मोरे यांना जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन, बालविकास प्रकल्प, ग्रामपंचायत, समाजकल्याण, प्राथमिक शिक्षण विभागात देखील काम केल्याचा प्रदीर्घ अनुभव असून त्यांचे कार्य कुशल आणि समाधानकारक प्रशासकीय कामकाज पाहता प्रशासकिय दृष्टिकोनातून त्यांना ही एक संधी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांनी दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे पंचायत समिती माणगाव आता पर्यंतच्या कार्यकाळात सहाय्यक प्रशासन अधिकारी यास प्रथमत सहाय्यक गट विकास अधिकारी ह्या पदावर श्री. राजाराम मोरे साहेबांच्या रूपाने संधी मिळाली याचा समस्त माणगाव करांसह रायगड जिल्ह्यास आनंद होत आहे.

राजाराम मोरे हे 'सहाय्यक गट विकास अधिकारी' या पदावर 2 सप्टेंबर 2024 रोजी हजर झाले आहेत. त्यामुळे आता त्यांच्या प्रशासकिय कामकाजाची जबाबदारी देखील वाढली असून ते या पदाला निश्चितच योग्य तो न्याय देतील यात शंका नाही. त्यांचा मित्र परिवार आणि हितचिंतकांकडून त्यांना सोशल मीडियाच्या वॉट्सअप, फेसबुक आणि प्रत्यक्ष भेटून त्यांना अभिनंदनपर शुभेच्छा देत आहेत.

# खोटे आश्वासन देणाऱ्या उमेदवाराला येणाऱ्या निवडणुकीत हद्दपार करा-भीमसेन आप्पा लोमटे

## अंबाजोगाई केज मतदारसंघातील नागरीकांनी नेत्यांच्या भुलथाप्यांना बळी पडू नये ।

अंबाजोगाई । परवेज पटेल

राज्यात विधानसभा निवडणूक वातावरण चांगलेच तापलेले दिसून येत आहे, विधानसभेचे वारे वाहू लागले त्याच पार्श्वभूमीवर बडगांवशेरी मतदारसंघात सर्व पक्षांनी आप आपली कबर कसुन कामाला लागल्याचे चित्र दिसून येत आहे आपल्याला पक्षाकडून उमेदवारी कशी मिळवता येईल आपण निवडून कसे येणार याकडेच सर्व उमेदवारांचे लक्ष लागले आहे. परंतु या मध्ये कोणी हे विचार करत नाही कि निवडून आल्यावर आपल्या मतदारसंघातील बेरोजगारी, नव नवीन उद्योग, कायदा मुव्यवस्था, रस्ते, भुयारी गटार, विद्युत रोषणाई असे विविध विकासाचे प्रश्न कसे मार्गी लावायचे नागरिकांना लागणारे सोय सुविधा कसे पुरवावेत या उमेदवारांना निवडून आल्यावर का विसरपडतो पाच वर्षाच्या कालावधीत फक्त आपला आणि आपल्या जवळील कार्यकर्त्यांचाच विकास करायचं आणि आपल्या मतदार क्षेत्रातील जनतेला वाऱ्यावर सोडून द्यायच आणि निवडणूक आली कि यांना आपल्या मतांची गरज पड़ते. मंग आत्ता नागरिकांचे मते कशी मिळवायची नवीन नवीन फंडे अजमावून भोळी भाळी जनतेचे मत कसे मिळवायचे याकडे याचे लक्ष लागलेले असते आणि निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर हे उमेदवार मतदाताला खोटी आश्वासणे देतात अशा भुलथाप्यांना मतदातांनी बळी न पडता येणाऱ्या निवडणुकीत अंबाजोगाई केज मतदारसंघातील नागरिकांनी विचार करून मतदान करावे असे अहवान युवा नेते भीमसेन आप्पा लोमटे यांनी केले मतदान हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे आणि त्यासाठी जनतेचा आवाज असणे आवश्यक आहे प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे नागरिकांच्या मतांचे प्रतिनिधित्व करून जगात बदल घडवणे अत्यावश्यक आहे मतदान हे एक महत्त्वाचे नागरीक कर्तव्य आहे जे आपल्या देशाच्या भविष्यावर लक्षणीय परिणाम करू शकते. मतदानामुळे राजकारण्यांना त्यांच्या कृतींसाठी जबाबदार राहण्यास मदत होते आणि आपल्या लोकशाहीची चौकट तयार होते. मतदाताचा वापर हे नेते मंडळी फक्त निवडणूकित करतात नंतर नागरिकांशी यांचा कसलाच संबंध नसतो, मतदारसंघात विकास करायचे सोडून हे स्वार्थी होतात आणि स्वतःचा विकास आणि जवळीक कार्यकर्ताचा विकास जास्त करतात मोठ मोठे माळ्यां लक्झरी गाड्यां यांच्याकडे अचानक येतात कुठून असा प्रश् उपस्थित होत आहे! नागरिकांनी येणाऱ्या निवडणुकीत आपल्या मताचा मूल्य काय आहे हे यांना दाखवून दिले पाहिजे या राजकारणी नेत्यांना मतदाताची गरज असते, नागरिकांच्या मतांवर हे निवडून येतात हे आठवण करून देण्याची अत्यंत गरज आहे, त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत अंबाजोगाई केज मतदारसंघातील नागरिकांनी विचार करून योग्य त्या उमेदवाराला मतदान करावे असे आहवान युवा नेते भीमसेन आप्पा लोमटे यांनी केले



# कोकणाची गाडी वांजरा फाट्यावर थांबते मग बीड जिल्ह्याची का नाही ?

# कोकण मधील चिपळूण आगाराच्या गाडीला सुद्धा वांजरा फाट्यावर अधिकृत बस थांबा आहे बरं...

## वारक-यांच्या हिताचे कामासाठी प्रधान्य देऊ - हनुमंत पवार

कुसळंब | प्रतिनिधी

अनेक वर्षापासून वांजरा फाटा येथील बस थांबा करण्यासाठी अनेक जण प्रयत्न करत आहेत त्यामध्ये राजमुद्रा सामाजिक संघटना वारंवार निवेदन देऊन बस थांबा ची मागणी करत आहे. वांजरा फाट्यावरील बस थांबा अत्यंत महत्त्वाचा असून त्याकडे बीड जिल्ह्यातील सर्व आगार प्रमुखांनी सत्संग दुर्लक्ष केले आहे. परंतु कोकणामधील चिपळूण




आगाराने मात्र अधिकृत वांजरा फाटा बस थांबा केला आहे चिपळूण आगाराची प्रत्येक गाडी वांजरा फाट्यावर थांबते पण बीड जिल्ह्यातील कोणत्याच आजाराची गाडी वांजरा फाट्यावर थांबायला तयारच नाही हे मात्र दुर्दैव आहे. राजमुद्रा सामाजिक संघटनेच्या माध्यमातून व पत्रकाराच्या माध्यमातून वांजरा फाटा बस थांबा साठी बीड जिल्ह्याचे नियंत्रक यांना व आमदार बाळासाहेब आजबे यांना निवेदन देऊन मागणी केली आहे परंतु अद्याप हा बस थांबा न झाल्याने नागरिकांचे अजूनही हाल होत आहेत. बीड जिल्ह्यातील कोणतीच गाडी अधिकृत थांबत नसल्याने नागरिकांना आर्थिक खर्च व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. आता पुन्हा एकदा राजमुद्रा सामाजिक संघटना, पत्रकार संघटना आणि रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानच्या माध्यमातून बस थांबा साठी अधिकृत वेगळे पाऊल उचलणार असल्याची माहिती मिळत आहे.

### चुंबळी फाटा, सौताडा पेक्षा वांजरा फाट्यावर जास्त गर्दी तरीही बस थांबा नाही ?

चुंबळी फाटा व सौताडा येथे जे नागरिक बस ने जाण्यासाठी उभे असतात ती नागरिक कुसळंब व परिसरातून जाऊन आपली बस पकडण्यासाठी सौताडा किंवा चुंबळी फाटा या ठिकाणी जातात कारण की वांजरा फाट्यावर बस थांबा नसल्याने त्यांना जावं लागतं..

### वांजरा फाट्यावरील बस थांबा ; आगार प्रमुखाची उदासीनता ?

वांजरा फाटा येथे बस थांबा करण्यासाठी अनेक वर्षापासून अनिवेदने वर्तमानपत्रातून बातम्या संबंधित आगर प्रमुखांना भेटून विनंती करूनही अद्याप मांजरा फाट्यावरील बस थांबा अधिकृतपणे बीड जिल्ह्यातील आगार प्रमुखांकडून सुरू झालेला नाही परंतु कोकणामधील चिपळूण आगाराने मात्र अधिकृत बस थांबा आहे असं सांगितलं आहे आणि चिपळूण आगाराची प्रत्येक गाडी वांजरा फाट्यावर अधिकृतपणे थांबते त्याबद्दल कुसळंब ग्रामस्थांकडून त्यांचे खूप खूप आभार...

# दिलासादायक:अमृत योजना कायम ठेवून ब्राह्मण समाजासाठी लवकरच भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ होणार !

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बैठकीत दिले ब्राह्मण समाजाला आश्वासन - बाजीराव भैय्या धर्माधिकारी

मुंबई । प्रतिनिधी
गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी विविध स्तरातून सरकार दरबारी पाठपुरावा केला जात आहे. यामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे ही मागणी लावून धरण्यात आलेली आहे. राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या संदर्भाने ब्राह्मण समाजाच्या शिष्टमंडळाची विशेष बैठक घेऊन चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून येत्या कॅबिनेटमध्ये आर्थिक विकास महामंडळाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले असल्याची माहिती ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिलीआहे. गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची लवकरच सोडवणूक होणार असून या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहावर आज




ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी विशेष बैठक घेऊन चर्चा केली. परळी येथे झालेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेतील मुख्य ठराव म्हणून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी एकजुटीने मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने राज्यात समाज बांधवांच्या वतीने विविध स्तरावर आंदोलने, निवेदने व आपापल्या स्तरावरून शासन दरबारी पाठपुरावा केला गेला. परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐक्य परिषदेत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सरकारच्या वतीने सकल ब्राह्मण समाजाला याबाबत समन्वयक म्हणून आपण भूमिका पार पाडू असा शब्द दिला होता. त्या अनुषंगाने सरकार दरबारी याबाबतचा पाठपुरावा सुरू होता. ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी सातत्याने सरकार दरबारी याबाबत पाठपुरावा केला. त्याचप्रमाणे विविध ठिकाणी समाज बांधव उपोषणाला बसले होते. त्यावेळीही वेळोवेळीही ना.धनंजय मुंडे यांनी सकारात्मक भूमिका घेत ब्राह्मण समाजाला आश्वासित केले होते. तीच भूमिका पार पाडत सरकारच्या स्तरावर हा प्रश्न सोडवण्यासाठीही धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून ब्राह्मण समाज शिष्टमंडळाची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ची बैठक ठरवण्यात आली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून लवकरात लवकर भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ हे ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या शिष्टमंडळात ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी,परळी वैजनाथ, विश्वजीत देशपांडे,पुणे,मनोज जोशी, लातूर, शैलेश कुलकर्णी, अंबेजोगाई, अजिंक्य पांडव, बीड , सचिन वाडे पाटील, संभाजीनगर,महेश दोरवट पाटील, संभाजीनगर,काकासाहेब कुलकर्णी, सोलापूर, संजय कुलकर्णी-सुपेकर, गंगाखेड,रमण उपाध्याय, जालना,डॉ. संजीवनी पांडे, मुंबई, विजया कुलकर्णी, संभाजीनगर सूर्यकांत देशमुख, बार्शी, शशांक खेर, डोंबिवली, आलोक चौधरी-सेलू, सौ. धनश्रीताई उत्पात, पंढरपूर आदीसह ब्राह्मण समाजातील प्रमुख समन्वयक पदाधिकारी उपस्थित होते.

## ठाणे तहसिलची अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्यांवर धडक कारवाई.

संतोष पडवळ - प्रतिनिधी ठाणे ता ३ : मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल criminal writ petition नं.२९११/२०२२ च्या अनुषंगाने




जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे आणि प्रांताधिकारी उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख निवासी नायब तहसिलदार दिनेश पैठणकर यांच्यासह मंडळ अधिकारी मुंब्रा व मंडळातील सर्व तलाठी यांनी मुंब्रा ते कल्याण दरम्यान रेल्वे ट्रॅकजवळ होणाऱ्या अनधिकृत रेती उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी आज दि.०२ सप्टेंबर २०२४ रोजी बोटी द्वारे गस्त घातली असता, खाडी पात्रामध्ये अनधिकृत रेती उत्खनन करणारी अंदाजे 15 ब्रास रेतीने भरलेली एक बार्ज तसेच एक सक्शन पंप आढळून आले. अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारवाईत खाडीपात्रामध्ये अनधिकृत रेती उत्खनन करणारी अंदाजे 13 ब्रास रेतीने भरलेली दुसरी बार्ज तसेच एक सक्शन पंप कळवा बाळकुम खाडीत आढळून आले. परंतु हे बार्ज व सक्शन पंप खाडीपात्रातून बाहेर काढता येत नसल्याने बार्ज व सक्शन पंप जाळून खाडीमध्ये बुडवून नष्ट करण्यात आले असून यापुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

## अर्धवट नाली व रोडचे काम करून जाणीवपूर्व बंद - माजी सैनिक प्रकाश वाघमारे राहते घर क्षितीग्रस्त

### न.प.मुख्याधिकारी यांना निवेदन वार्ड क्र. २२ मधील रोड नालीचा प्रश्न लावा मार्गी लावा-माजी सैनिक प्रकाश वाघमारे

बीड । प्रतिनिधी
बीड शहरातील वार्ड क्रमांक २२ मधील माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी दिले न.प. रोड व नाली सदावट केलेल्या कामाची बजावणी करा निवेदन मुख्याधिकारी यांना क्रमांक ६७८१ सिटी सव्हे नं. १६२ तरफ पिंगळे येथे कृषी कॉलनी, कॅनॉल रोड यास्थळी माझे घरकुल असून या वार्डचे मेंबर वाघमारे गणेश आहेत. २००७ पासून माझे येथे रहिवासी आहेत. यावर्षी तेथे फक्त माडा घर होते. यावेळी १००० फुटाचा रोड दक्षिण-उत्तर माझ्यात घरापर्यंत झालेला होतो. वास्तव्य आहे.
घराच्या समोर २० फुट ओपन पेस जागेच्या बाजुस पूर्व दक्षिण रोड नवीन वस्ती झाल्याने २००० फुट पर्यंत झाले आहेत. घराचे तोंड पुर्वीकडे आहे. तसेच घराच्या दक्षिण बाजुने ३५० फुटाचा रोड होणं अतिमहत्वाचे आहे. नाली पाईप लाईनचे पोल १० वर्षापूर्वी येथे टाकले आहेत. तसेच घराच्या उत्तर बाजू कृषी कॉलनी, रोड झाला आहे. दक्षिण बाजुच्या शेजारच्या वस्तीला रोड झाले आहेत. नेमके घराशेजारील रोड 2008 ते 2024 पर्यंत बनवला नाही. आता सध्या व गेल्या वर्षी रोडचे काम होत आहेत, झाली आहेत. घरालगत पाईप लाईन नादुरुस्त वर्ष भर पाण्याने वाहत आहे. त्याचे पाणी घरात सतत येत आहे. त्यामुळे घरातील माणसे आजारी आहेत आणि याच जागेतून जाणारा रोड सतत विनंत्या करून कॉन्ट्रक्टर करत नाहीत अशी माहिती मिळते की कागदपत्री हा रोड बनवल्याचे




दाखवून पैसे उचललेले आहेत. प्रत्येक वर्षी पावसाळ्यात घराशेजारी पाणी साचल्यास खड्डा झाल्याने माझ्या घरात भिंतीमध्ये पाणी मुरत असून सिमेंट कन्स्ट्रक्शन पावर कमी होवून सिमेंटचे मजबूती विरघळत असून घराच्या कॉलम जवळ चिरा पडल्या आहेत. घराच्या समोर व ओपन पेस जवळ रोड नाल्या केल्याने पाणी मोकळ्या जागेत झिरपू शकत नाही. ज्यामुळे सर्व पाणी माझ्या घरात पायात जात आहे. समस्या गंभीर झालो आहे. बँकेचे लोन घेवून घर बनवले आहे. मालमत्ता कर नगर परिषदचा भरत आहेत . आता हा प्रकार गंभीर झाला असून रस्ता नाले स्वच्छता देण्याचे काम आपले आहे काही अनर्थ घडला तर आपण जबाबदार असताना १५ दिवसात ही समस्या न सोडल्यास आपणाविरूध्द न्यायीक मागनि विचारणा करण्यात येईल.

## युवानेते यशराज पंडित यांच्या मध्यस्थीने प्रहारच्या दिव्यांगांचे आमरण उपोषण सुटले

### आज मिळणार प्रत्येकी २ हजार रुपये

गेवराई । प्रतिनिधी
विविध मागण्यांसाठी गेवराई नगर परिषदे समोर आमरण उपोषणाला बसलेल्या दिव्यांगांच्या प्रश्नाबाबत शिवसेना युवानेते यशराज पंडित यांनी योग्य मध्यस्थी केल्याने अखेर आंदोलन दिव्यांगांनी आमरण उपोषण आंदोलन सोडले असून, त्यांना आज दिनांक 4 सप्टेंबर रोजी प्रत्येकी दोन हजार रुपये देण्याचे नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक विक्रम मांडुरके यांनी लेखी आश्वासन दिले आहे.
याबाबत अधिक माहिती अशी की, दिव्यांगाच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष शेख राजू हे दिव्यांग सहकाऱ्यांसह गेवराई नगर परिषदेच्या समोर दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी आमरण उपोषणाला बसले होते. आंदोलनकर्त्याच्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या निर्णयानुसार दिव्यांगांसाठी आरक्षित असलेले नगरपरिषद च्या वार्षिक उत्पन्नातील पाच टक्के निधी दिव्यांगांना वाटप होत नाही तो संपूर्ण पाच टक्के निधी समप्रमाणात तात्काळ वाटप करण्यात यावा, दिव्यांगांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा. दिव्यांगांना उद्योग धंद्याकरिता जागा व गाळे उपलब्ध करून देण्यात यावे. दिव्यांगांना घरपट्टी व नळपट्टी 50% सवलतीचा लाभ देण्यात यावा. दिव्यांगांना सर्व सोयनयुक्त दिव्यांग भवन उभारण्यात यावे. दिव्यांगाच्या आर्थिक विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आपण आमरण उपोषण आंदोलन सोडणार नाही, असा ठाम निर्धार प्रहारचे शहराध्यक्ष शेख राजू यांच्या नेतृत्वाखाली उपोषणाला बसलेल्या रफिक बागवान, शेख मुस्तफा, शेख रईस, सय्यद खाजा, मुजिबशा दर्गिशा, सय्यद इस्माईल, भगवान खेत्रे, किशोर टोणपे, रहीम तांबोळी आदी आंदोलनकर्त्या दिव्यांगांनी केला होता.



दरम्यान शिवसेना युवानेते यशराज बदामराव पंडित यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या समजून घेत, नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक विक्रम मांडुरके यांची भेट घेऊन सकारात्मक चर्चा केली. दिव्यांगांच्या मागण्या योग्य असून त्यावर तात्काळ निर्णय घ्यावा अशी आग्रही मागणी त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली. त्या अनुषंगाने संबंधित सर्व दिव्यांगांना आज दिनांक 4 सप्टेंबर 2024 रोजी प्रत्येकी दोन हजार रुपयाची वाटप करण्यात येईल, त्यासोबतच उर्वरित रक्कम डिसेंबर 2024 महिन्याअखेर सर्व दिव्यांगांना दिली जाईल असे लेखी आश्वासन मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी आंदोलकांना दिले. त्यासोबतच दिव्यांगांचे 100 घरकुलाचे प्रस्ताव दाखल झाल्यास त्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल आणि उर्वरित मागण्याही पूर्ण केल्या जातील अशी ग्वाही दिली. त्यानंतर युवानेते यशराज पंडित यांनी आंदोलक आणि मुख्याधिकारी यांच्यात योग्य मध्यस्थी केल्याने अखेर आंदोलनकर्त्या दिव्यांगांनी यशराज पंडित, मुख्याधिकारी विक्रांत मांडुरके यांच्या हस्ते पाणी पिऊन आपले उपोषण सोडले. सहाय्यक प्रकल्प अधिकारी आर ए वाव्हळे आणि न प कर्मचारी दिनेश औटे, यांनीही मध्यस्थीची योग्य भूमिका पार पाडली. यावेळी प्रहारचे जिल्हाध्यक्ष निजाम खान पठाण, तालुकाध्यक्ष अर्जुन सुतार, शहराध्यक्ष शेख राजू, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष जुनेद बागवान, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, पत्रकार शुभम घोडके, शेख रईस, सय्यद इशरार, वैशाली सुतार, जयश्री राजाभाऊ ,खेत्रे मावशी, जमील राज, शेख यासीन, इम्रान इनामदार, शेख सलमान, मुजीब शेख आदींची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077